# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 01.08.2024** **वार – गुरुवार**

---

**स्वप्नील कुसाळे**

भारताचा नेम बाज स्वप्नील कुसाळे याने आज पॅरिस ऑलिम्पिकमध्ये 50 मीटर रायफल थ्री पोझिशन प्रकारात कास्य पदक पटकावलं. कोल्हापूर जिल्ह्यातील कांबळ वाडी गाव च्या स्वप्नील नं मिळवलेल्या या ऐतिहासिक विजयानंतर कोल्हापूरातल्या त्याच्या राहत्या घरी जल्लोष करण्यात आला. स्वप्नील ने पुण्याच्या बालेवाडी इथल्या क्रीडा प्रबोधिनी मध्ये नेम बाजीचं प्रशिक्षण घेतलं आहे. खाशाबा जाधव यांच्या नंतर भारताला ऑलिम्पिकमध्ये वैयक्तिक पदक मिळवून देणारा; स्वप्नील, हा राज्यातला पहिला खेळाडू ठरला आहे. स्वप्नील कुसाळे याच्या यशाबद्दल त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राज्यपाल सी पी राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वप्नीलचं अभिनंदन केलं आहे. उपमुख्यमंत्री; पुण्याचे पालक मंत्री आणि महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष अजित पवार यांनीही स्वप्नीलचं अभिनंदन केलं असून कोल्हापूरच्या मातीतल्या या सुपुत्राने महाराष्ट्राचा गौरव वाढवला आहे; राज्याच्या क्रीडा क्षेत्राला नवं चैतन्य, ऊर्जा दिली आहे, अशा शब्दात त्याचा गौरव केला आहे.

**लोकमान्य टिळक अण्णा भाऊ साठे**

थोर स्वातंत्र्य सेनानी लोकमान्य बाळ गंगा धर टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त आज पुण्यात त्यांना विविध संस्था संघटनांच्या वतीनं आदरांजली अर्पण करण्यात आली. साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांनाही आज ठिकठिकाणी अभिवादन करण्यात येत आहे. सावित्री बाई फुले पुणे विद्यापीठात लोकमान्य बाळ गंगा धर टिळक आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना आज अभिवादन करण्यात आलं. अण्णाभाऊ साठे यांना 'भारतरत्न' पुरस्कार देण्याची मागणी करण्यासाठी आपण स्वतः पाठपुरावा करणार असल्याचं केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांनी आज पुण्यात सांगितलं. या संदर्भात लवकरच पंतप्रधान आणि केंद्रीय गृहमंत्र्यांशी चर्चा करणार असल्याचं ते म्हणाले. मातंग समाज समन्वय समितीनं आयोजित केलेल्या अभिवादन सोहळ्यामध्ये ते बोलत होते. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने आजपासून विचार प्रबोधन पर्वाचं आयोजन करण्यात आलं आहे. पाच दिवस चालणाऱ्या या महोत्सवाचं उद्घाटन आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते झालं. पुणे महापालिकेतही आज लोकमान्य टिळक आणि अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करण्यात आलं.

**नदी काठ**

नदी काठ सुधार प्रकल्पांतर्गत तोडल्या जाणाऱ्या झाडांच्या ऐवजी; पुणे महापालिका; वन विभागाच्या माध्यमातून पुरंदर तालुक्यात वृक्षारोपण करणार आहे. या जागेसाठी दोन कोटी 35 लाख 70 हजार रुपये, महसूल विभागाकडे भरण्याच्या प्रस्तावाला स्थायी समितीने मान्यता दिली आहे. या प्रकल्पांतर्गत नदीच्या दोन्ही बाजूंचा 44 किलोमीटरचा काठ सुशोभित केला जाणार आहे. यासाठी महापालिका वन विभागाची सुमारे 11 हेक्टर जागा ताब्यात घेणार आहे.

**सर्वेक्षण**

पुण्याच्या लोहगाव विमानतळावरील धावपट्टी विस्तारासाठी आवश्यक असणारं ओ एलएस सर्वेक्षण पूर्ण झालं आहे. त्या संदर्भातला अंतिम अहवाल भारतीय विमानतळ प्राधिकरणाकडे सोपवण्यात आला आहे. धावपट्टीच्या विस्तारानंतर प्रत्यक्ष विमान उतरण्याच्या ठिकाणी कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी हे सर्वेक्षण अतिशय महत्वाचं आहे. अहवालाला मान्यता मिळाल्यानंतर धावपट्टी विस्ताराच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात होणार आहे.

**Pcmc**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहानिमित्त सुरक्षा लेखापरीक्षण तसंच बाल सुरक्षा कार्यक्रम राबवला जात आहे. त्यासंदर्भात उपाययोजना करण्याच्या दृष्टीने अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच बैठक झाली. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.

**आंदोलन**

पुणे बंगळूर राष्ट्रीय महामार्गांच्या रुंदी करणाचं काम सुरू असून या संपूर्ण रस्त्यावर प्रचंड खड्डे पडले असल्या नं वाहन चालकांना अतोनात त्रास होत आहे; मात्र तरीही या मार्गावर पथ कर  वसुली सुरूच आहे. या विरोधात काँग्रेस पक्ष येत्या शनिवारी आंदोलन करणार आहे.

**पर्यटन**

पुणे जिल्ह्यातील मावळ मुळशी तालुक्यातील पर्यटन स्थळांवर पर्यटकांसाठी लावण्यात आलेले निर्बंध उठवण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनानं घेतला आहे. मात्र पर्यटकांनी अति उत्साह दाखवू नये असं आवाहन जिल्हा प्रशासनानं केलं आहे.

**Pcmc पाणीसाठा**

पिंपरी चिंचवड मध्ये संभाव्य अतिवृष्टीच्या अनुषंगाने पूर बाधित नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यासाठी महापालिकेनं नियोजन केलं आहे. महापालिकेच्या वैद्यकीय विभागाची 16 पथकंही तयार करण्यात आली आहेत.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज अधून मधून पावसाच्या मध्यम सरी बरसत आहेत. उद्याही हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता असून घाट परिसरात मुसळधार पावसाचा इशारा पुणे वेधशाळेनं दिला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**